# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४१
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
तार : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ 1385          दिनांक : ९ मे,२००१

परिपत्रक क्र.६८.

**विषय** : अपूर्ण असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीबाबत.

तुमच्या अधिकार क्षेत्रात वेगवेगळ्या स्तरावर अंमलबजावणी खाली असलेल्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी सुरु आहे. सदरची अंमलबजावणी प्राधान्यक्रमानुसार सुरु असुन, कमीत-कमी निधीमध्ये जास्तीत-जास्त किफायतशीर पध्दतीने योजना राबवून लाभधारकांना लवकरात-लवकर पाणी पुरवठा सुरु करण्याचा उद्देश समोर ठेवण्यात आला आहे.

प्रस्तुतच्या उन्हाळ्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी व विशेषतः टंचाईग्रस्त जिल्ह्यांमध्ये पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती उद्भविण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने काही महत्वाच्या भूमिका व कर्तव्ये पार पाडणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हा स्तरावर, विभागीय स्तरावर होत असलेल्या बैठकांमधून मार्गदर्शन मिळत असते व वेगवेगळ्या जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे योग्य ती कृती करण्यात येत आहेच. तरीही पुढील १-२ महिने कामाचे प्रमाण थोडेफार वाढणार असून स्थानिक लोकांच्या अपेक्षा सुध्दा वाढलेल्या असतील. त्यासाठी परिस्थिती कौशल्याने हाताळावी लागेल. खालीलप्रमाणे कृतीची दिशा ठेवल्यास अडचणी कमी येतील.

१. अस्तित्वात असलेल्या योजनांची देखभाल व दुरुस्ती स्थानिक स्वराज्य संस्था करत असतीलच मात्र त्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे जे मार्गदर्शन किंवा सल्ला आवश्यक असेल तो सुलभतेने देण्याची पध्दत अंगीकारली जावी. जेथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे देखभाल व दुरुस्ती पाहिली जात आहे तेथे अधिक दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या जाव्यात.

२. ज्या योजना दि.१५ मे,२००१ किंवा दि.१ जून,२००१ पर्यंत पाणी पुरवठा सुरु करता येण्यासारख्या असतील ती कामे करुन घेण्यासाठी सर्व क्षेत्रीय अधिकारी प्रयत्नशील आहेतच . त्या ठिकाणी काही अडचणी असल्यास त्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी मुख्य अभियंता स्तरापर्यंत आपल्या पाहिजेत व मुख्य अभियंत्यांनी आवश्यकता असल्यास मुख्यालयात सदस्य सचिव स्तरापर्यंत दूरध्वनीव्दारे संपर्क साधून सोडवून घेणे आवश्यक ठरते. अन्यथा छोट्या-छोट्या अडचणींसाठी कामे खोळंबून राहतात.

३. जिल्हापरिषदेतर्फे सध्या काही योजनांची कामे सुरु आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता हे "जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी" म्हणून तांत्रिक दृष्ट्या जिल्हापरिषदेच्या कामावर सध्या 'नियंत्रक अधिकारी' म्हणून कार्यरत आहेत. त्या दृष्टीने सर्व अधीक्षक अभियंत्यांना सूचना दिल्या जाव्यात की, जिल्हापरिषद स्तरावरील योजनांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीवर लक्ष ठेवले जावे. तसेच त्याबाबतचा अहवाल त्यांनी मुख्य अभियंत्यांकडे निदान दि.१५ जुलै, २००१ पर्यंत नित्यनियमाने १५ दिवसांनी पाठविण्याची पध्दती ठेवावी. मुख्य अभियंता स्तरावर १५ दिवसांनी असा अहवाल संकलित करुन मुख्यालयात सदस्य सचिव स्तरावर जिल्हानिहाय जिल्हापरिषदेमार्फत अंमलबजावणी होत असलेल्या योजनांची प्रगती, संख्यात्मक स्वरुपाची तसेच काही तातडीच्या/तात्पुरत्या मंजूर केलेल्या नव्या योजना, जिल्ह्या-जिल्ह्यात अशा प्रगतीवर असलेल्या योजना यांची माहिती दर १५ दिवसांनी दि.१५ जुलै,२००१ पर्यंत पाठविल्यास तुमचे विभागातील या योजनांबाबतच्या प्रगतीची कल्पना येवू शकते.

४. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे ज्या ठिकाणी अनामत रक्कम प्राधिकरणाने दिलेली होती त्या ठिकाणची कामे प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावयाची होती. प्रस्तुतच्या उन्हाळ्यामध्ये अशी कामे पूर्ण झाल्यास काही ठिकाणी पाणी पुरवठा सुरु होवून लाभधारकांना पाणी मिळेल. तरी, याबाबत अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर आढावा घेवून तुमचे स्तरावरही तुमचे विभागात योग्य तो पाठपुरावा होत रहावा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे सध्या ज्या ठिकाणी विद्युत जोडण्यांची कामे करावयाची होती ती करुन घेता आल्यास आणखी काही पाणी पुरवठा योजनांचा लाभ वेगवेगळ्या ठिकाणी करुन देता येईल.

....२....

५. काही शहरी पाणी पुरवठा योजनांबाबत ज्या स्थानिक संस्थांनी कर्जाव्दारे किंवा स्वतंत्र निधीतून निधीची उपलब्धता प्राधिकरणाला वेळीच करुन न दिल्यामुळे योजनांची कामे रखडलेली आहेत. या सर्व स्थानिक संस्थांशी संपर्क साधण्याचे काम सुरु झालेले आहे पण त्यामध्ये म्हणावी तशी प्रगती झालेली दिसत नाही. प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिका-यांना यांची पूर्ण जाणीव करुन देण्याची गरज आहे व अशा प्रकारे त्या योजनेला कर्जाव्दारे हुडको किंवा आयुर्विमा महामंडळाकडून पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यामध्ये प्राधिकरणाने पुढाकार घ्यावयास हवा. कारण, असा निधी उपलब्ध झाल्यास अंमलबजावणी करावयाच्या योजनांमधून १७.५% ई.टी.पी.चार्जेस प्राधिकरणाला मिळतात व पर्यायाने आपल्या सर्वांच्या आस्थापना खर्चासाठी निधी उपलब्ध होतो व त्या दृष्टीने अशी कर्ज प्रकरणे करुन घेणे तसेच त्या कर्ज प्रकरणांचा पुढे सातत्याने पाठपुरावा करुन वित्तीय संस्थांकडून कर्ज मंजूर करुन घेणे शेवटी प्राधिकरणाच्या फायद्याचे आहे. या दृष्टीकोनातून या विषयाचा विचार होवून त्याचा पाठपुरावा क्षेत्रीय अधिका-यांनी करण्याच्या सूचना द्याव्यात. अशी कर्ज प्रकरणे दिनांक ३० मे २००१ पर्यंत पूर्ण करुन घ्यावीत.

६. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे येणे वसूल करण्याचे प्रकरणात गेल्या वर्षी फारच थोडी प्रगती व परिणामकारकता दिसून आली आहे. ही बाब योग्य वाटत नसून या बाबीकडे म्हणावे तितके लक्ष न दिल्यामुळे हे घडले आहे. सबब, प्राधिकरणाचे येणे वसूल करणेसाठी जास्तीत-जास्त कठोर भूमिका प्रत्येक स्तरावर घेण्याच्या सूचना दिल्या जाव्यात व अशी वसूली प्रत्यक्ष केली जाईल हे पाहणे गरजेचे आहे. काही ठिकाणी आकारणीबाबत साधेसाधे व महत्वाचे दोष आढळून आले आहेत. घरगुती वापराची जोडणी घेवून त्याचा व्यापारी उपयोग होतो ही गोष्ट दक्षतापूर्वक शोधून काढून व्यापारी दराने आकारणी केल्यास महसूलात नक्की वाढ होईल. तसेच, अनधिकृत जोडण्या आणि अन्य गळती यांचा शोध घेण्याचे काम अगदीच नगण्य स्वरुपाचे झालेले आहे. त्याचा विचार होवून महसूली उत्पन्नात वाढ करण्यासाठी सूचना व मार्गदर्शन द्यावे.

७. योजनेमधून पाणी पुरवठा सुरु झाला किंवा योजना पूर्ण झाली तरी ती हस्तांतरित करण्याची कार्यवाही होत नाही याबाबत अगोदरच सूचना दिलेल्या आहेत. कोणतीही योजना पूर्ण करावयाची असेल किंवा पाणी पुरवठा सुरु करावयाचा असेल तर त्याअगोदरच संबंधित अधिका-यांनी निश्चित खात्री करुन घ्यावी की, ती योजना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था ताबडतोब ताब्यात घेणार आहे व चालविणार आहे. असे होणार नसेल तर अशा योजना पूर्ण करण्यासाठी निधी प्राधान्याने देणे धोक्याचे ठरेल याची नोंद घ्यावी. याचाच अर्थ योजनेतून पाणी पुरवठा सुरु झाला किंवा ती पूर्ण झाली तरी या दोन्ही परिस्थितीत अशी योजना स्थानिक स्वराज्य संस्थेने ताब्यात घेतलीच पाहिजे आणि तेही स्पष्टपणे व कणखरपणे स्थानिक अधिका-यांनी संबंधितांना सांगितले पाहिजे.

एकंदरितच प्रस्तुत पाणी टंचाईच्या दिवसांमध्ये क्षेत्रीय अधिका-यांनी दक्ष राहण्याची गरज असून, नवीन पाणी पुरवठा सुरु करताना किंवा थोड्याफार नवीन लोकांची सोय होईल अशा रितीने योजनांची अवधणी किंवा अंमलबजावणी पूर्ण करताना हे अत्यावश्यक आहे. तसेच त्यासाठी काही छोट्या-मोठ्या तांत्रिक/आर्थिक/प्रशासकीय अडचणी असतील तर त्या क्षेत्रीय अधिका-यांनी मुख्य अभियंत्यांच्या स्तरावर दुरध्वनीवरुन संपर्काव्दारे आणून मुख्य अभियंत्यांनी त्या मुख्यालयात सदस्य सचिव स्तरावर दुरध्वनीवरुन संपर्काव्दारे आणण्याची पध्दत पुढील महिना-दोन महिन्यांच्या काळात तुम्ही अंमलात आणली पाहिजे. जेणेकरुन, प्राधिकरणाला कठीण परिस्थितीमधून का होईना दिलेली कर्तव्ये पार पाडण्यामध्ये पुरेशी सुकरता येईल. जो निधी उपलब्ध होईल त्यामध्येच अधिकाधिक योग्य अशी कामे त्यामुळे केली जातील अशी दक्षता सर्व संबंधितांनी बाळगणे अत्यावश्यक आहे.

प्रति,
सर्व अधीक्षक अभियंता,
म. जी. प्रा. मंडळ

(सुरेश साळवी)
सदस्य सचिव

प्रत : सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,ठाणे/पुणे/औरंगाबाद/ अमरावती/नाशिक/नागपूर
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई

M. J. P.
ISSUED
5 MAY 2001
MUMBAI-21